भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2018-19/183
डीसीएम(पीएलजी)क्र.2746/10.25.07/2018-19 मे 14, 2019

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/
मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व बँका

महोदय/महोदया,

**रोकड व्यवस्थापन बाहेरुन करविणे - व्यवहारांचा मेळ**

ऑक्टोबर 4, 2016 रोजीच्या चलन विषयक धोरण निवेदनाच्या परिच्छेद 15 मध्ये दिल्यानुसार, खजिन्याची/रोख रकमेची ने-आण करण्याबाबतच्या सुरक्षेच्या संपूर्ण व्याप्तीचा आढावा घेण्यासाठी, ह्या बँकेने, चलन हालचालीवरील समिती स्थापन केली होती (अध्यक्ष - श्री. डी के मोहंती, कार्यकारी संचालक, भारतीय रिझर्व्ह बँक). संबंधित बँक, सेवादाता आणि त्यांचा पोट-कंत्राटदार (एटीएम मध्ये कॅश भरणे) ह्यामधील व्यवहारांचा वेळेवारी असलेला मेळ ह्याबाबत ह्या समितीने केलेल्या शिफारशी तपासण्यात आल्या आहेत. त्यानुसार, बँकेने पुढील प्रक्रिया अनुसरावी असे ठरविण्यात आले आहे.

(अ) चेस्ट/नोडल शाखा ह्यांच्याशी सल्लामसलत करुन, सेवादात्याने त्याची कॅश इंडेंटस किमान एक दिवस आधी (टी - 1, टी हा कॅश लोडिंगचा दिवस आहे) सादर करावीत. रोख रक्कम काढण्यासाठी अनेक ठिकाणे टाळावीत व प्रत्येक केंद्रासाठी केवळ एकच ठिकाण असावे. तथापि, महानगर केंद्रासाठी रोख रक्कम काढण्यासाठी दोन केंद्रे ठेवता येऊ शकतात.

(ब) बँक, सेवादाता व त्याचे पोट कंत्राटदार ह्यामधील व्यवहारांचा मेळ घालण्याचे काम किमान टी + 3 धर्तीवर केले जावे.

मुद्रा प्रबंध विभाग , 4था मजला, अमर बिल्डिंग, पी.एम मार्ग ,फोर्ट, मुंबई 400001
फोन/: (022) 2260 3000 / 4000 फॅक्स: (022) 2266 2442 ईमेल: cgmincdcm@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.**

(क) एखादा वाद, किंवा सुरक्षेचा भंग/तसा भंग करण्याचा प्रयत्न/घालून दिलेल्या कार्यरीतीचा भंग ह्याबाबत कळविण्यात आल्यास, सेवादाता व त्याचे पोट-कंत्राटदार ह्यांनी विनंती केल्यास, बँक त्यांना एटीएमचे व्हिडियो फूटेज उपलब्ध करुन देऊ शकते.

(2) रोकड व्यवस्थापनासाठी बाहेरुन व्यवस्था करण्याचा एक भाग म्हणून, बँकेने तिच्या सेवादात्याला व त्याच्या पोट-कंत्राटदाराला पुढील बाबतीत प्रोत्साहन द्यावे.

(अ) डेटा परत मिळविण्यासाठी व मेळ घालण्यासाठी एक सक्षम डिजिटल रेकॉर्ड मॅनेजमेंट प्रणाली स्थापन करणे.

(ब) कर्मचा-यांची रेकॉर्ड्स निर्दोष असल्याची खात्री करुन घेण्यासाठी, स्वयं विनियामक संस्थेकडून, कोणताही अनन्य अशी रीत/संकेत ह्यामार्फत, व्यवसाय स्तरावर, कर्मचा-यांचा डेटा बेस तयार करुन ठेवण्यात यावा.

आपला विश्वासु,

(संजय कुमार)
महाव्यवस्थापक